सत्यमेव जयते

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎ २२६७०२१० /१४८ /२४८,२२१०२२२२ फॅक्स : २२६७३९१५
Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 2267 0210 /148 /248, 22102222 Fax : 22673915

**ई-मेल** - sec.mpsc@maharashtra.gov.in **वेबसाईट** - www.mpsc.gov.in , www.mahaonline.gov.in


**संचालक, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, गट - अ (औरंगाबाद)**

**धारिका क्रमांक :२२४६/९६२४/पंधरा** **जाहिरात क्रमांक : ७८ /२०१४**

आयोगामार्फत महाराष्ट्र शासनाच्या **संचालक, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, गट - अ (औरंगाबाद)** च्या एका पदासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| एकूण | अमागास |
|---|---|
| १ | १ |

**२.१** शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१०/प्र.क्र. ३५५/का.२८,दि.१३जाने.२०११ तसेच शासन निर्णय क्र. न्यायाप्र/२००९/प्र. क्र.९/सुधार -३ दि.१३ ऑगस्ट २००९ च्या अनुषंगाने १)चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायू (locomotor disability or cerebral palsy) असे अपंगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी अर्ज करु शकतात.

**३. वेतनश्रेणी** : : १५,६००-३९,१०० + (ग्रेड पे - ७,६००)/- अधिक इतर भत्ते

**४. पात्रता – उमेदवार भारतीय नागरिक असावा.**

**४.१ वय- दिनांक १ जून,२०१४** रोजी **५५** वर्षापेक्षा जास्त नसावे.

**४.२ शैक्षणिक अर्हता :-**

**१)**कोणत्याही सांविधानिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील स्नातक पदवी किंवा भारतीय सैन्य दलात मान्यता असलेली तत्सम परीक्षा **आणि**

**२)**भारतीय सेना दलातील कर्नल किंवा वरच्या पदावरील किंवा भारतीय नौदलातील किंवा भारतीय वायुदलातील तत्सम पदावरील उमेदवार असणे आवश्यक आहे किंवा त्या पदावरील सेवानिवृत्त उमेदवार **आणि**

**३)**इंग्रजी व मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.

(i) Preferably served in NDA/IMA or any other training Institute of the Armed Forces an Instructor Group A/B or have served as Commandent of a Training Institute.

(ii) Should preferably have done Interviewing Officers Course or the GTO's (Group Testing Officer's) Course or Prepare Cadets for the SSB (Service Selection Board).

**टीप १)** पदवीधर उमेदवार उपलब्ध नसल्यास कला, विज्ञान किंवा वाणिज्य या शाखेतील इंटरमिजिएटची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा विचार केला जाईल. **२)** जर आवश्यक दर्जाचा अधिकारी उपलब्ध नसेल तर भारतीय संघराज्याच्या सशस्त्र दलातील लेफ्टनंट कर्नल दर्जापेक्षा कमी नसलेले पद भूषविणारा निवृत्त अधिकारी अथवा नौदल / हवाई दलातील तत्सम दर्जाचा निवृत्त अधिकारी यांचा विचार करण्यात येईल. **३)** या पदासाठी नेमणूक प्रथमतः ३ वर्षासाठी, त्यानंतर वर्षा - वर्षाला मुदत वाढविता येईल, एकूण ६ वर्षापर्यंत मुदत.

**५.**प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरिता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव यांच्या आधारे निकष निश्‍चित करून अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्‍चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही, तसेच अपवादात्मक शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अपवादात्मक अनुभवाच्या तरतुदीच्या अनुषंगाने वयोमर्यादा शिथिल केली जाणार नाही. चाळणी परिक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतील. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क,निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**६. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

**७. कर्तव्ये व जबाबदाऱ्या** - प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशील आयोगाच्या **www.mpsc.gov.in** वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**८.** प्रस्तुत पदांना शासनाने दिनांक ८ जून २०१० रोजी निर्गमित केलेली महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमावली २०१० लागू आहे.

**९ . शुल्क :**

**९.१ अमागास - रु. ४१५/-** **९.२ मागासवर्गीय - रु. २१५/-**

**१०. अर्ज करण्याची पध्दत –**

**१०.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**१०.२**पात्र उमेदवारांना वेब-बेस्ड (Web-based) ऑन लाईन अर्ज www.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ ते २० मार्च, २०१४** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

**१०.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**१०.४** विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**१०.५** आयोगाने निश्चित केलेला परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे (२) नेटबँकिंग (३) डेबीट कार्ड (४)क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/ सीएससी (नागरीक सेवा केंद्र)

**१०.६** www.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतींमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

**१०.७** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

(२) " माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह सेल. ज्या पदासमोर **'Unpaid '** असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी **'Pay Now'** अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) **"Pay Now"** या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. (१) ऑनलाईन पेमेंट (२) नागरी सुविधा केंद्र (३)चलानद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**११.** चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास चाळणी परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेश प्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमदेवाराने चाळणी परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व चाळणी परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१२.** चाळणी परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय चाळणी परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१३.** आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधन आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

**१४. उमेदवाराने मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीचे वेळी सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

**१५.विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक २० मार्च, २०१४ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

**१६. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्याps भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २१ मार्च, २०१४ पर्यंत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही..**

**ठिकाण :- मुंबई** **राजन बा. खोत**

**दिनांक :- २८ फेब्रुवारी, २०१४** **उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग**